**नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ ची अंमलबजावणी करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:नाजक-२२०९/प्रक्र.३५/नाजकधा-२
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: १८ मार्च, २००९.

# परिपत्रक

केंद्र शासनाचा नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ राज्याने स्वीकृत करुन नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ हा दि.२९/११/२००७ पासून निरसित केला आहे. निरसन अधिनियमांतर्गत मूळ अधिनियमातील कलम १०(३) व १०(५) अन्वये जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतलेली कार्यवाही व कलम २० अन्वये सवलत देण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्याबाबतची कार्यवाही संरक्षित करण्यात आली आहे. नाजकधा अधिनियमातील तरतुदींन्वये अतिरिक्त घोषित जमीन शासन ताब्यात न घेता, सदर अधिनियमाचे कलम २० अन्वये खालीलप्रमाणे सवलती देण्यात आलेल्या आहेत :-

(अ) निवासी प्रयोजनासाठी वापरण्यायोग्य जमिनीवर गृहनिर्माण योजना राबविणे,

(ब) औद्योगिक प्रयोजनासाठी वापरण्यायोग्य जमिनीवर सुरु असलेले उद्योग चालविणे वा त्याचा विंस्तार करणे.

(क) शेती वापराखालील परंतु बांधकाम योग्य जमिनी शेती प्रयोजनासाठी उपयोगात आणणे.

सदर सवलती काही अटी व शर्ती घालून देण्यात आलेल्या आहेत. अशा जमिनी शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत करण्याबाबत तसेच इतर कामासाठी वापरण्यावर बंधने घालण्यात आलेली आहेत व अशा परवानगीसाठी शासनास अधिमुल्य (Premium) देय करण्यात आले आहे.

०२. नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने दि.०१/०३/२००८ व दि.०३/०३/२००८ च्या पत्रान्वये हमी पत्राव्दारे जमिनीचे विकसन अथवा हस्तांतर करण्यासाठीची कार्यपध्दती विशद करण्यात आलेली आहे. तथापी, शासनाच्या